**तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ९७/२०२३**
**निशाणी क्र.४९**

**महाराष्ट्र शासन** सरकारी अभियोक्ता
**..वि..**
**अजित दुंडेकर व इतर** आरोपी.

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ३** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | घनश्याम पंजाबराव दंदे |
| वय अंदाजे ४८ वर्षे | धंदा- नोकरी अन्न सुरक्षा अधिकारी, अमरावती |
| राहणार | अमरावती, ता. जि. अमरावती |
| **सरतपासणी श्री. डाहे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

दिनांक १४/१२/२०२१ रोजी मी अन्न सुरक्षा अधिकारी या पदावर कार्यरत होतो. माझ्या नावाचे नोटिफिकेशन प्रकाशीत झालेले असून त्यामध्ये १५४ क्रमांकावर माझे नाव आहे व माझे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. मला सर्व प्रतिबंधित अन्न पदार्थाबाबत कारवाई करण्याचे अधिकार आहे. नोटिफिकेशनची प्रत मी दाखल केलेली असून त्यावर माझी सही आहे व **ते निशाणी क्रमांक ५० वर आहे**. दिनांक १५/०७/२०२१ रोजी संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये गुटख्याची विक्री, वाहतूक, साठवणूक व उत्पादन यांच्यावर एक वर्षाकरीता एका राजपत्राव्दारे अन्न सुरक्षा आयुक्त यांनी बंदी घातलेली आहे. सदरच्या राजपत्राव्दारे प्रकरणात दाखल आहे.

२. पोलीस निरीक्षक जुनघरे यांनी मला दिनांक १४/१२/२०२१ रोजी फोनव्दारे कळविले की प्रतिबंधीत अन्न पदार्थ जप्त करण्यात आलेला आहे व पुढिल कारवाईसाठी हजर राहा. त्यानंतर मी ग्रामीण पोलीस स्टेशन, यवतमाळ येथे मी, पंच साक्षीदार चेतन कांतीलाल सोडा यांच्या सोबत पोलीस स्टेशन येथे हजर झालो. त्यानंतर तेथे हजर असलेले पोलीस निरीक्षक श्री जुनघरे यांनी मला माहिती दिली की, आर्णी रोडवरील जगदंबा इंजिनिअर कॉलेजजवळ गुप्त माहितीवरुन त्यांनी सापाळा

रचला असता एक वाहन ओमणी ॲम्बुलन्स एम.एच/२९ टी- ३२५६ यवतमाळवरुन आर्णीकडे जातांना आढळून आले, त्यास त्यांनी थांबविले. तसेच त्यांनी त्या वाहनाच्या चालकास नाव विचारले असता त्याने त्याचे नाव अजित अनिल दुंडेकर असे सांगीतले व आणखी त्यांच्यासोबत असलेल्या दोन व्यक्तींनी त्यांचे नाव प्रदिप थावरा राठोड रा. आर्णी व दुसरा सैय्य्द रहेमान सैय्यद उमर रा. आर्णी असे सांगीतले. त्यानंतर श्री जुनघरे यांनी त्या वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये पांढ-या रंगाची चार पोती, त्या प्रत्येक पोत्यामध्ये २४ नग बब्बु गोल्ड सुगंधीत तंबाखु, प्रत्येक पॅकेट ५०० ग्रॅम, प्रत्येक पॅकेटची किंमत रुपये ३०० असे एकूण ९६ पॅकेट एकूण किंमत रुपये २८,८००/- असा साठा आढळला. सदर साठा प्रतिबंधित असल्यामुळे श्री जुनघरे यांनी घटनास्थळ पंचनामा करुन वाहन, साठा व आरोपी यांना यवतमाळ ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये घेवून आले. अशी माहिती मला श्री जुनघरे पोलीस निरीक्षक यांनी पोलीस स्टेशनला दिली. त्यानंतर त्यांनी पंचनामा व एक पत्र पुढिल कारवाईकरीता दिले. तसेच साठा व आरोपी माझ्या व पंचासमक्ष हजर केले व मला वाहन दाखविले. त्यानंतर मी आरोपींना नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे अजित दुंडेकर, प्रदिप थावरा राठोड आणि सैय्य्द रहेमान सैय्यद उमर असे सांगीतले. त्यानंतर मी सदर साठ्याची तपासणी केली असता, चार पांढ-या पोत्यामधील प्रत्येक पोत्यामध्ये २४ नग बब्बु गोल्ड सुगंधीत तंबाखु प्रत्येक पॅकेट ५०० ग्रॅम, प्रत्येक पॅकेटची किंमत रुपये ३०० असे एकूण ९६ पॅकेट एकूण किंमत रुपये २८,८००/- असा साठा आढळला. तसेच मला वर नमूद केलेले वाहन सुध्दा आढळून आले.

३. त्यानंतर मी आरोपीला विचारणा केली असता सदर साठा हा विक्री व साठवणूक करीत असल्याचे त्यांनी मला सांगीतले व सदर साठा हा मानवी शरीरास असुरक्षीत असल्याचे सांगीतले. सदर साठ्याची खरेदी देयक त्यांच्याकडे आढळून

आली नाही. त्यानंतर मी सदर साठ्यांचा तपासणी अहवाल तयार केला व त्याची एक प्रत मी आरोपीस दिली. सदर साठ्याची तपासणी मी पंच व आरोपी यांच्या समक्ष केली. तपासणी अहवाल मला दाखविला, त्यातील मजकूर बरोबर आहे व त्यावर माझी, पंचांची व आरोपीची सही आहे व **तो निशाणी क्रमांक ५१ वर आहे**.

४. सदर साठा हा प्रतिबंधीत असल्यामुळे त्यामधील एक पॅकेट मी नमूणा म्हणून घेतले, त्यास पांढ-या दोरीने बांधून एक नमूणा भाग तयार केला. त्यानंतर सदर पदार्थाचे नमूणा लेबल तयार करुन त्यावर मी, आरोपी व पंचांनी सही केली. ते लेबल मी सदर भागावर डिंकाने चिटकविले. त्यानंतर मी सदर नमूणा भाग मी खाकी रंगाच्या कागदामध्ये गुंडाळून त्याची दोन्ही टोके आतील बाजूस दुमडून डिंकाने चिटकविली. त्यानंतर सदर नमूणा भाग पांढ-या दो-याने उभा-आडवा बांधून लाखेच्या व पितळी मुद्रेच्या सहाय्याने चार सिल केले.

५. त्यानंतर सदर भाग मी स्वतःच्या ताब्यात घेतला. त्यानंतर उर्वरीत साठा व वाहन जप्त करुन पोलीसांच्या ताब्यात मी दिला. त्यानंतर मी सदर घटनेचा घटनास्थळ पंचनामा तयार करुन टाईप केला. पंचनाम्यावर माझी, पंचांची आणि आरोपीची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **त्यास निशाणी क्रमांक ५२ देण्यात आलेला आहे**.

६. त्यानंतर मी आरोपींच्या विरोधात कैफियत दिली. कैफियत मला दाखविली, त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे व ती **निशाणी क्रमांक ५३** वर आहे. त्या कैफियतीसोबत मी तपासणी अहवाल, जप्ती पंचनामा, अधिसूचना, जप्त साठा व वाहन पोलीसांना दिले होते. माझ्या कैफियतीवरुन पोलीसांनी आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंदविला. प्रथम वर्दी अहवाल मला दाखविला, त्यावर माझी सही असून, त्यातील मजकूर बरोबर आहे व तो **निशाणी क्रमांक ५४** वर आहे.

७. त्यानंतर दुस-या दिवशी दिनांक १५/१२/२०२१ रोजी अन्न विश्लेषक, नागपुर येथे नमूणा विश्लेषणाकरीता एका पत्राव्दारे पाठविला व त्याबाबतच्या पत्रावर माझी सही असून, त्यातील मजकूर बरोबर आहे व ते पत्र **निशाणी क्रमांक ५५** वर आहे. सदर नमूण्यांचा विश्लेषण अहवाल नागपूर येथील प्रयोग शाळेतून मला प्राप्त झाला व त्या अहवालानूसार सदर अन्न पदार्थ हे अन्न सुरक्षा आयुक्त यांच्या अधिसूचनेनूसार प्रतिबंधित असल्याचे अहवालामध्ये नमूद आहे व **तो अहवाल निशाणी क्रमांक ५६ वर आहे**. तो अहवाल मी पत्र पाठवून पोलीस स्टेशनला पाठविला, त्या पत्रावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे व **ते पत्र निशाणी क्रमांक ५७ वर आहे**.

८. त्यानंतर दिनांक ०९/११/२०२२ रोजी सदर प्रकरणाचा प्रस्ताव संमती आदेश मिळण्याकरीता सहाय्यक आयुक्त, यवतमाळ यांना दिला, त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे व तो प्रस्ताव **निशाणी क्रमांक ५८ वर** आहे. सहाय्यक आयुक्त यवतमाळ यांनी संमती आदेश मिळण्याकरीता सदर प्रस्ताव सह आयुक्त, अमरावती यांना पाठविला व त्याची एक प्रत मला दिली व **ती निशाणी क्रमांक ५९ वर** आहे. त्यानंतर सदर प्रकरणातील संमती आदेश सह आयुक्तांनी पारीत केले, ज्याची प्रत मला देण्यात आली असून ती प्रत **निशाणी क्रमांक ६० वर** आहे. आज दोन आरोपी न्यायालयात हजर आहे व मी त्यांना ओळखतो.

**(मध्यांनाची वेळ झालेली असल्यामुळे साक्षीदाराची उलटतपासणी तहकूब करण्यात आली.)**

(पी.एस.इंगळे)
दिनांक - ०८/०४/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

**<u>मध्यांतरानंतर शपथेवर उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. एन. एन. खिलजी यांचे मार्फत</u>**

**<u>सुरु -</u>**

९. मी पोलीसांकडे लेखी कैफियत दिली. कैफियत देतांना मी पोलीसांना सांगीतले नव्हते की *"माझ्या नावाचे नोटिफिकेशन प्रकाशीत झालेले असून त्यामध्ये १५४ क्रमांकावर माझे नाव आहे व माझे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. मला सर्व प्रतिबंधित अन्न पदार्थाबाबत कारवाई करण्याचे अधिकार आहे".*

१०. हे म्हणणे खरे आहे की घटनेबाबतची सर्व माहिती मला पोलीसांनी दिली. हे म्हणणे खरे आहे की मला घटनेबाबत वैयक्तीक माहिती नाही. मी जगदंबा इंजिनिअर कॉलेज येथील कथित घटनास्थळावर गेलो नाही. तपास सुरु असे पर्यंत मी घटनास्थळावर गेलो नाही. पोलीसांनी मुद्देमाल १६.३० वाजता जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की १६.३० वाजता नंतर लगेच पोलीसांनी मला फोन लावला होता. जगदंबा इंजिनिअर कॉलेज आणि पोलीस स्टेशनमधील अंतर मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळ यवतमाळ शहराच्या परिसरामध्ये आहे. मी १८.०० वाजता पोलीस स्टेशनला पोहोचलो व लगेच मी कारवाई सुरु केली व पोलीस स्टेशनला कैफियत दिली व या सर्व कारवाईला अंदाजे एक तासाचा वेळ लागला.

११. हे म्हणणे खरे आहे की जेव्हा मला पोलीसांनी पोती दाखविली तेव्हा ती उघडी होती व उघडलेल्या पोत्यामधूनच मी नमूणा काढला. हे म्हणणे खरे आहे की ते कथित चार पोते पोलीसांनीच मला दाखविले. त्या पोत्यांवर कोणतेही चिन्ह नव्हते. ती कथित चार पोती प्लॉस्टीकची होती. मात्र ही बाब पंचनाम्यामध्ये व माझ्या कैफियतीमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की मी अश्या कोणत्याही प्रकारची पोती जप्त केली नाही व त्यामुळे त्याचे सविस्तर वर्णन मी कैफियतमध्ये व पंचनाम्यामध्ये नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की जेव्हा पोलीसांनी मला पोती दाखविली तेव्हा तेथे आरोपी हजर नव्हते.

१२. कथित जप्तीबाबत केलेल्या सिलचा नमूणा मी न्यायालयात दाखल केलेला नाही. कथित मुद्देमाल कोठून आला होता व कुठे जाणार होता याची मी शहानिशा केली नाही. तसेच कथित वाहनाबददल सुध्दा मी शहानिशा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की कथित पंचनामा तयार करतांना मी आणि पोलीस तेथे हजर होतो.

१३. अन्न विश्लेषकांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आरोपीला अपिल करण्याची संधी आहे याची माहिती मी आरोपीला दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की अन्न विश्लेषकांचा अहवाल ४५ दिवसांच्या आतमध्ये प्राप्त करुन घ्यावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की मी पत्र दिल्याच्या ४५ दिवसांच्या आत अन्न विश्लेषकांचा अहवाल मला प्राप्त झाला नाही.

१४. पंचांना हजर राहण्याबाबत मी सूचनापत्र दिले नाही. पंच माझे नातेवाईक व मित्र नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या कार्यालयात बसून पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की मी पंचांची सही माझ्या कार्यालयात घेतली. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीकडून कोणताही साठा जप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपींच्या विरोधात कोणतीही कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी पोलीसांच्या सांगण्यावरुन मी खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचा गुटख्याशी व त्या पोत्यांशी काहीही संबंध नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास-काही नाही.** श्रवणोत्तर स्वीकृत,

(पी.एस.इंगळे)

दिनांक - ०८/०४/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.